# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. महाडीबीटी-२०२४-२५/शिष्यवृत्ती शाखा/६५०६ दिनांक : २३.०७.२०२४

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचा विद्यार्थी, पालक व संस्था प्रतिनिधी यांचेशी संवाद.**

संदर्भ : - १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/ प्र.क्र. ३३२/ तांशि-४ दि. ०७.१०.२०१७.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. शिष्यवृ. २०२४/ प्र.क्र. १०५/ तांशि-४ दि. ०८.०७.२०२४.
३. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे महत्वाचे परिपत्रक क्र. उशिंस शिष्यवृत्ती/व्या.अ.प्र.मु./२०२४ दि. २३.०७.२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, शासन निर्णय दि. ७.१०.२०१७ नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्र निकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे/ स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुला-मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येतो.

तसेच संदर्भाधित शासन निर्णयान्वये, राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतने/ सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठ / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमास शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process- CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक

उत्पन्न रु. रु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील नविन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेश असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्र शिक्षण विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागाकडून वर्ष २०२४-२५ पासून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येणार आहे.

तसेच वरीलप्रमाणे शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे. अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दि. ०६.०४.२०२३ मध्ये नमूद केलेला ''संस्थात्मक'' व ''संस्थाबाह्य'' या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यात येत आहे.

उपरोक्त नमूद शासन निर्णयानुसार आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे विद्यार्थी हिताच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांबाबतची माहिती देण्याकरिता राज्यातील सर्व विद्यार्थी, पालक व संस्था प्रतिनिधी यांचे सोबत **श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि. २५ जुलै, २०२४ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० दरम्यान WEBINAR च्या माध्यमातून संवाद साधणार आहेत.**

तरी, या कार्यक्रमाचे LIVE प्रक्षेपण आपापल्या संस्थांमध्ये मोठ्या पडद्यावर (SCREEN वर) सर्व विद्यार्थी व पालक यांना दिसेल व ऐकू येईल अशा पध्दतीची व्यवस्था करण्यात यावी व याकरीता आपापल्या संस्थेतील / विद्यापीठ / महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व पालक यांना सदर कार्यक्रमास संस्थेत उपस्थित रहाणेबाबत सूचना देण्यात याव्या.

या कार्यक्रमासाठी WEBINAR ची लिंक खालीलप्रमाणे आहे.

**http://www.parthlive.com**

**(डॉ. केशव तुपे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १६ यांना माहितीस्तव सविनय सादर.